International Research Journal of Humanities, Language and Literature ISSN: (2394-1642)
Impact Factor 6.959 Volume 9, Issue 7, July 2022
Association of Academic Researchers and Faculties (AARF)
Website-www.aarf.asia, Email : editoraarf@gmail.com

# भारतीय जातिव्यवस्था:उत्पत्ती,जातविरोधी आंदोलने आणि वर्तमान: एक शोध

**डॉ.प्रकाश कांबळे,** सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, ए.डी.पी.एम.चे महिला महाविद्यालय, जळगाव

प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारतीय जातिव्यवस्थेची उत्पत्ती/तिची भयावहता,तिचे समर्थक या गोष्टींचा पहिल्या टप्प्यात विचार केला जाईल.दुसऱ्या टप्प्यात जाती व्यवस्थेविरोधात निर्माण झालेल्या जाती अंताच्या चळवळी यांचा विचार करून वर्तमानात जाती अंतासाठी करावयाचा प्रभावी कृती कार्यक्रम मांडला जाणार आहे.

स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षानंतरही जातीचा प्रशन तितकाच टवटवीत आहे.समृद्ध भारत !बलशाली भारत असा कितीही जयघोष केला तरी जोपर्यंत या देशातील जाती संपून माणसाकडे माणूस म्हणून पाहिले जातनाही,त्याला संपूर्णपणे फुलण्याची संधी मिळत नाही तोपर्यंत अशा घोषणा केवळ मनाचे मनोरे ठरतील.जातीअंत करण्यासाठी जातीव्यवस्था नीट समजून घेणे गरजेचे आहे.या जात व्यवस्थेचे फायदे कोणाला झाली आहेत आणि आजही होताहेत तसेच तिचे बळी कोण आहे आणि त्यिविरोधात कोणी आणि कशापद्धतीने लढे उभे केले आहेत हे समजून घेतले की मग वर्तमानात जाती अंताचा काय कार्यक्रम असू शकतो हे आपणाला कळू शकते.थोडक्यात काय,र जातिव्यवस्थेचा इतिहास समजून घेतला पाहिजे म्हणजे त्या संपण्याचा मार्ग शोधता येईल.

जातीच्या उत्पत्ती संदर्भात अनेक सिद्धांत मांडले गेले आहेत.एक सिद्धांत पारंपारिक पुरोहित वर्गाने मांडला आहे.तो असा की,ब्रह्मदेवाच्या शरीरातून चार वर्ण निर्माण झाले आहेत.डोक्यातून ब्राह्मण,बाहुतून क्षेत्रीय,पोटातून अर्थात कंबरेतून वैश्य आणि पायातून क्षुद्र.हा सिद्धांत तर्काच्या कसोटीवर टिकणारा नाही.म.जोतिराव फुले यांनी या सिद्धांताची खूप खिल्ली उडविली आहे.ते गुलामगिरी या ग्रंथात म्हणतात,"ब्राह्मीला डोक्यातून,बाहूतून आणि पायातून मासिक पाळी येत होती का?" जोतिबांचे सर्व लेखन तर्काच्या कसोटीवर आधारलेले होते.त्यांचा गुलामगिरी हा ग्रंथ अनेकार्थाने सर्वश्रेष्ठ असा आहे.वर्णव्यवस्थे संदर्भात दुसरा सिद्धांत मांडला आहे टो असा, " भारताची मुल संसाकृती ही कृषी संस्कृती होती.या कृषी संस्कृती मध्ये मातृसत्ताक पद्धती होती.स्त्रीला सन्मानाचे स्थान होते.शोषण हा प्रकार येथे नव्हता.विषमता नव्हती.सर्व आबाद असताना इ.स. ६०० ते ३०० या कालखंडात उत्तर ध्रुवावरून गाई-गुरे घेवून आले आणि येथील अनार्यावर आक्रमण केले.शस्त्र-सज्ज आर्याशी आनार्यानी तुंबळ युद्ध केले.मात्र युद्धा ची तत्वे न पाळता आर्यांनी आनार्यात फुट पाडून युद्ध जिंकले.हरलेल्या अनार्यावर अमानुष अटी/नियम लादले. लढाई अध्यर्यात सोडून आर्याशी हातमिळवणी करणार्यांना क्षुद्र घोषित केले,मात्र त्यांचा स्पर्श अपवित्र मनाला नाही.त्यांच्याबरोबर थोडाफार माणुसकीने व्यवहार करण्याचे धोरण ठरले.जे शेवट पर्यंत लढले त्यांना अस्पृश्य घोषित केले.ज्यांना अस्पृश्य घोषित केले होते त्यापैकी काहींनी युद्धात परभुत होऊनही अपमानास्पद अटी अमान्य करून जंगलात निघून गेलेते म्हणजे आजचे आदिवासी भावंड होय"२जगद्विख्यात अशा अनेकानेक समाज शास्त्रज्ञानीही भारतीय जातिव्यवस्थेचा अभ्यास केला आहे.त्यात नेसफिल्ड रिस्ले,सेनार्त यांच्यासारख्या अभ्यासकांचा समावेश आहे. डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्यासारखे भारतींय अभ्यासकांची मानाडलेला अभ्यासही महत्त्वपूर्ण असा आहे.मात्र या सर्व अभ्यासामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जोभारतीय जातीसंस्थे उगम,उत्पत्ती आणि विकासाचा

© Association of Academic Researchers and Faculties (AARF)
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

शोध घेतला आहे  तो अभुतपुर्व असा आहे आणि म्हणूनच तो जगभर मान्यता पावला आहे.त्यांनी इ.स. १९१६ मध्ये Cast In India :there genesis mechanism & Development हा शोधनिबंध लिहिला त्यात त्यांनी जि जातिव्यवस्थेची मीमांसा केली आहे टी जगभर गाजली..बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीचा उगम वर्गाच्या पोटात शोधला आहे.जातीच्या वर्गाची चर्चा करतांना ते सतत सांगत आली की 'जगातील सर्व समाजाप्रमाणे भारतीय समाजात सुद्धा वर्गीयच होता परंतु जगात कुठेही भारतीय समाजाप्रमाणे जाती निर्माण झाल्या नाहींत त्या भारतातच का आणि  कशा निर्माण झाल्या या प्रश्नाचे उत्तर देताना डॉ.बाबासाहेब म्हणतात,"भारत सोडून अन्य अन्य सर्व समाज हे वर्गीयदृष्ट्या खुले  राहिले तेथील विवाहसंस्था धर्मापासून मुक्त राहिली तिथल्या धर्मानी वर्गा वर्गात  विवाह कधीच निषिद्ध मानले नाहीत.वर्गीय समाज खुला असणे याचा अर्थ याच जन्मात माणसाला आपल्या कर्तुत्वाने वर्ग बदलता येणे शक्य होते.गरिबीत जन्माला आलेला माणूस श्रीमंत होऊ शकत होता व श्रीमंतीत जन्माला आलेला माणूस स्वतःच्या दुर्वर्तनानेखालच्या वर्गात जाऊ शकत होता.सर्वसामान्य पणे विवाह संस्था हि मुक्त होती.एका वर्गाचा माणूस दुसर्या वर्गातील स्त्री बरोबर विवाह करू शकत होता.म्हणजेच वर्गावर्गात विवाह संबंध अस्तित्वात असल्याने त्या समाजात जाती निर्माण होऊ शकल्या नाहीत.परंतु भारतात असे घडू न शकल्यामुळे जाती जाती निर्माण झाल्या" ३ असे बाबासाहेबांच प्रतिपादन आहे.त्यांच्या मताप्रमाणे' भारतीय समाज वर्गीय होता.हे वर्गही खुले होते.विवाहसंस्था मुक्त होती.परंतु कालौघात वर्ग बंदिस्त झाले.वर्गाबाह्य विवाहांना समाजाने आणि धर्माने निषिद्ध ठरविले पर्यायाने अंतर्वर्गीय विवाह संपुष्ठात आले.ज्याक्षणी या गोष्टी घडल्या त्या क्षणी भारतामध्ये जातीप्रथेचा उगम झाला.अशाप्रकारे बाबासाहेबांनी जातीप्रथेच्या उगमाव]ची मीमांसा केली आहे.वर्गांतरगत विवाहांना धर्माने पवित्र मानले.म्हणून बाबासाहेब म्हणतात 'जातीसंस्था हि माणसाने कृत्रिमपणे निर्माण केलेली संस्था आहे ती नैसर्गिकदृष्ट्या निर्माण झालेली नाही.

**बंदिस्त वर्ग म्हणजे काय?**

डॉ.बाबासाहेबांनी जातीची व्याख्याच मुळी Enclosed Class is a caste'अशी केलेली आहे.म्हणून हे वर्ग बंदिस्त होतात म्हणजे कसे हे समजून घेणे आवश्यक आहे. caste in Indiaया शोधनिबंधामध्ये वर्ग बंदिस्त कसा होतो याचे उदाहरण बाबासाहेबांनी दिले आहे.त्यांच्या मते वर्ग बंदिस्त करण्यासाठी विवाह संस्थेचा उपयोग केला कारण त्यांना त्यातून जातीची निर्मिती करावयाची होती.या कामी त्यांनी साधन म्हणून  स्त्रियांचा अत्यंत घृणास्पद वापर केला आहे.हे समजावून सांगताना बाबासाहेब म्हणतात,समजा शंभर (१००)लोकांचा एक वर्ग आहे त्यात ५० स्त्रिया आणि ५० पुरुष आहेत.हा वर्ग मोकळा असेल तेव्हा या वर्गातील पुरुष आणि स्त्रिया इतर वर्गातील पुरुष आणि स्त्रियाशी विवाह करू शकत असत तोपर्यंत हा वर्ग इतर वर्गाप्रमाणेच गतिमान असतो ,मुक्त असतो.परंतु जेव्हा या वर्गातील पन्नास पुरुष आणि पन्नास स्त्रिया यांच्या व्यतिरिक्त अन्य वर्गात या पुरुष अथवा स्त्रीला प्रवेश करण्यास बंदी केली जाते किंवा या शंभर स्त्री-पुरुषा पैकी कोणालाही दुसऱ्या वर्गात प्रवेश करण्यास बंदी केली जाते तेव्हा वर्ग बंदिस्त होतो त्याची सर्व गतिमानता संपते.वर्गाचे मुल स्वरूप बदलून जाते आणि त्याचे जातीत रूपांतरण होते.या शंभर स्त्री-पुरुषापैकीएका साठवर्षीय पुरुषाचा मृत्यू झाला व त्याची पन्नास वर्षाची बायकी जीवनात राहिली तर याचा अर्थ असा होतो की,त्या वर्गात पन्नास स्त्रिया व एकोणपन्नास स्त्रिया शिल्लक उरतील.म्हणजेच पुरुषापेक्षा एक स्त्री अधिक उरेल  डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या स्त्रीला 'सरप्लस वुमेन'असा शब्द वापरला आहे.आता ही वाढीव स्त्री जिवंत राहिली तर अनाचार करेल आणि आपल्या कामवासनेची भूक भागविण्यासाठी आपला वर्ग सोडून इतर वर्गातील पुरुषासी रत होईल अशी शंका निर्माण होऊन या वाढीव स्त्रीबद्दल निर्णय घेऊन टाकला की, तिला तिच्या नवर्याच्या चितेवर जाळून टाकून तिच्यापरवर्गातील पुरुषाशी रत होण्याच्या शक्यतेचा नायनाट करायचा. हे नोंदवून बाबासाहेब म्हणतात'आपल्या देशात सतीची चाल निर्माण झाली तिचे मूळ या ठिकाणी आहे."४ ज्या स्त्रीच्या नवऱ्याचा मृत्यू झालाय त्याच्याच चितेवर तिला जाळून टाकल्याने तिच्याबद्दलचे पुढील सर्व धोके टळतात व वर्ग बंदिस्त करून जात निर्माणास कसलीही अडचण राहत नाही.जातीच्या निर्मितीसाठी ब्राह्मणी व्यवस्थेने अतिशय रानटीपद्धतीने स्त्रीचा बळी दिलेला आहे.केशवपन आणि तत्सम भयंकर

चालीरीतीच्या माध्यमातून तिला जगण्यापेक्षा मरण बरे वाटावे अशी परिस्थिती निर्माण केली व मनुस्मृतीच्या माध्यमातून मनुने या प्रत्येक क्रूर कर्मावर धर्माधिष्टनाचे पावित्र व सुरेख असे आवरण चढविल्यामुळे आपण जे करतो आहोत ते चुकीचे आहे हे पकोणाला वाटण्याचे कारण उरले नाही या मुळे हि अमानुष प्रथा कैक वर्ष टिकून राहिली.

आता थोडा उलट्या दिशेने विचार करून पाहू.. एखाद्या साठ वर्षाच्या पुरुषाच्या पत्नीचे निधन झाले तर काय करायचे?त्याला सती देणे तर शक्य नव्हेत?मग त्याला उपदेशाचे डोस पाजणे सुरु झाले.हा सर्व उपदेश ब्रह्मचर्याच्या भोवती पिंगा घालणारा होता.तरीही हा पुरुष एकटा राहिला तर तो परवर्गातील स्त्रीशी रत होईल व आपल बंदिस्त वर्ग मोडेल आणि जर असे झाले तर जाती निर्माण होणार नाहीत याची काळजी धर्ममार्तंडांना लागली.पत्नी मृत्यू पावलेल्या पुरुषाला त्याच्या वयाची स्त्री त्याला पत्नी म्हणून मिळणे शक्य नसल्यामुळे म्हणून त्यांनी कामवासनापूर्तीचा मार्ग शोधून काढला जो जगातील संस्कृतीने कधीही चोखाळलेला नाही.या साठ वर्षाच्या विधुराने बाहेरच्या वर्गातील स्त्रीशी रत होण्यापेक्षा आपल्याच वर्गातील ज्या लहान-लहान मुलींशी रत होण्याची परवानगी दिली तर हा पेच सुटणार होता म्हणून येथील ब्राह्मणी धर्मग्रंथांनी ६० वर्षाच्या विधुराला आठ/नऊ/दहा वर्षाच्या बालिकांबरोबर विवाह करण्याची परवानगी दिली आणि भारतात बाल-जरठ विवाहाची प्रथा सुरु झाली.मानवतेला काळिमा फासणाऱ्या या अमानुष प्रथा जातीच्या निर्माणासाठी जाणीवपूर्वक निर्माण केल्या गेल्या हे नीटपणे लक्षात घेणे आवश्यक आहे.म्हणूनच डॉ.बाबासाहेब म्हणाले होते'जातीसंस्थेने केवळ अस्पृश्यानाच छळले असे नाही तर,या जाती संस्थेच्या निर्मितीने संपूर्ण राष्ट्रालाच उद्ध्वस्त करून टाकले."६ या जातीसंस्थेने संपूर्ण भारतालाच आपल्या कवेत घेतले.वाऱ्याच्या वेगाने तिचाभारतभरात प्रसार झाला.

जातीच्या या प्रसाराचा हा शोध घेतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे"समाज हा अनुकरणप्रिय असतो.भारतातील ब्राह्मणेतर वर्गही अनुकरणप्रिय होता त्याने ब्राह्मण वर्गाचे अनुकरण केल्यामुळे जातीसंस्था तळापर्यंत जाऊन पोचली."७ या प्रक्रियेला त्यांनी अनुकरणाचा संसर्ग असे म्हंटले आहे.जातीची रचना स्तरिकृत असल्यामुळे आपल्याखाली कोणीतरी आहे याच्या अभिमानापोटी तिच्याविरुद्ध बंड होऊ शकले नाही.तत्कालात प्रसिद्ध असलेल्या 'मनु' नावाच्या ब्राह्मण ऋषीने या जातीव्यवस्थेचे प्रवक्तेपण घेवून तिला तात्विक मुलामा देण्याचे काम करून मनुस्मृतीच्या माध्यमातून हजारो जाती निर्माण केल्या.प्रस्तुत मनुस्मृतीचा अंमल समाजावर हजारो वर्ष राहिला.एखादा ग्रंथ किती विखारी असू शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मनुस्मृती हा ग्रंथ होय.म्हणूनच ग्रंथ हेच ज्याचे जीवन आणि मरण राहिले त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अत्यंत नाविलाजाने सदर मनुस्मृतीचे दहन करावे लागले.त्या अगोदर म.जोतिराव फुले यांनीसुद्धा मनुस्मृतीच्या दहनाची इच्छा प्रगट केली होती.त्यातूनच बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे जाहीर असे दहनकेले.मात्र तोपर्यंत या जातीव्यवस्थेचे इतके भयावह परिणाम झाले की त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.त्या परिणामाची संक्षिप्त नोदी जरी केल्या तरी ते आपल्या लक्षात येईल.

१.जातीव्याव्स्थेची रचना उतरंडी सारखी असल्यामुळे श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना प्रत्येकाच्या मनामध्ये रुजली.

२.उतरंडीच्या तळाशी असलेल्या जातींची अवस्था जनावरांपेक्षाही भयावह झाली.

३.अस्पृश्यता लादल्यामुळे मानवतेला काळिमा फासली गेली.

३.जातीनिहाय व्यवसायाची निर्मिती केल्यामुळे नाविन्यता आणि कुशलता याची फारकत झाली.

४,जातीला धर्म आणि धर्मग्रंथांचा आधार असल्यामुळे ते शोषणाचे केंद्र बनले.

५.जातीच्या प्रसार/प्रचारासाठी विविध धर्मग्रंथांची निर्मिती केली गेली.

६.जातिव्यवस्थेमुळे लोकभावना /सार्वजनिक हिताची भावना लोप पावली

७.हजारो जाती निर्माण केल्यामुळे प्रत्येक जात म्हणजे स्वतंत्र देश अशी अवस्था झाल्यामुळे राष्ट्र नावाची गोष्टच शिल्लक उरली नाही.प्रत्येक व्यक्ती राष्ट्रापेक्षा आपली जाता श्रेष्ठ माणूलागल्यामुळे संपूर्ण देश जातीचे कडबोळे अशी अवस्था झाली.

८.हजारो जाती निर्माण झाल्यामुळेच अनेकानेक परकीयांनी या देशावर आक्रमण करून त्याला अनेकदा गुलाम केले गेले.

९.केवळ मात्र साडेसहा हजार ब्रिटीश भारतात आले आणि करोडो भारतीयांना गुलाम केले ते या जातिव्यवस्थेमुळे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

१०.स्त्रीची अवस्था तर रंडकीच्या रांड पोरागत झाली.ती सिंगल नव्हे;डब्बल गुलाम झाली.

११.जात व्यवस्थेमुळे करोडो भारतीयांची मने श्बालीत झाली.जात नावाच्या मानसिक रोगाने ती जर्जर होवून गेली.भारतचे कंबरडेच मोडून गेले.या देशाला नेशन बनवायचे असेल तर जातीअंट हि त्याची पूर्वअट राहील.आज पर्यंतच्या इतिहासात या जातिव्यवस्थे विरुद्ध अनेकानेक निकराचे संघर्ष झाले.या संघर्षातून जात व्यवस्था खिळखिळीहि झाली ,मात्र पुन्हा टी नव्या जोमाने उभा राहते हे तिचे खास वैशिष्ट्य आहे.या जातिव्यवस्थेविरोधात जे काही घनघोर असे संघर्ष झाले त्याचा संक्षिप्त वेध घेणेही याठिकाणी आवश्यक आहे.

**जातिव्यवस्थेविरोधात झालेली आंदोलने :**

जातिव्यवस्थेच्या निर्मितीपासूनच तिच्या विरोधात आंदोलने सुरु झालेली दिसतात.तथागत गौतम बुद्धांनी जातीव्यवस्थेला पहिल्यांदा प्रचंड हादरा दिला.मुळात पशु/पक्षी/प्राणी आणि निसर्गात जाती असतात त्या माणसात कशा असणार? असा रोखठोक प्रशन बुद्धांनी विचारला.केवळ ते असा प्रशन विचारूनच शांत बसले असे नाही तर तर्कशुद्ध विचार करणाऱ्या भिख्खू संघाची निर्मिती केली.जोडीला दास्मुक्तीचे तत्त्वज्ञान निर्मिले.स्वतःसह हजारो भिख्खुना घेऊन विषमतेच्या विरोधात समतेचे विशाल अस आंदोलन उभा करून त्यात डोळे दिपवून टाकणारा विजय प्राप्त केला.म्हणजेच बुद्धाने विचाराच्या माध्यमातून सामाजिक क्रांति निर्माण केली व त्यातून सम्राट चंद्रगुप्त मोरयाची समतेची राजवट जन्मास आली.म्हणून जातीव्यवस्थेविरोधी आंदोलनाचा विचार करताना पहिल्यन्दा तथागतांच्या आंदोलनाचा विचार करावा लागतो.

मध्ययुगीन कालखंडातील तितकेच महत्त्वाचे आंदोलन म्हणजे संताचे आंदोलन होय.हे आंदोलन केवळ म्हाष्ट्रातच उभा झाले असे नाही तर या आंदोलनाने संपूर्ण भारत व्यापला होता.उत्तर/दक्षिण/पूर्व आणि पश्चिम या चारही दिशेला हि आंदोलने निर्माण झाली.हि सगळी समतेची आंदोलने होती मात्र भक्तीची आंदोलने म्हणून त्यचा मोठ्या प्रमाणात नोंदी केल्या गेल्या आहेत.डॉ बाबसाहेब आंबेडकर मात्र संताच्या या चळवळीकडे वेगळया दृष्टीकोनातून पाहतात आणि त्यांनी म्हणूनच असा निर्वाळा दिला आहे की,संतानी निर्माण केलेल्या सामाजिक आंदोलना मुलेच छ.शिवाजी महाराज स्वतःचे राज्य निर्माण करू शकले.अलीकडील काळात नवीन अभ्यसाकांची फळीहि या आंदोलनाचा विचार भक्तीची नव्हे;तर ही मानव मुक्तीची आंदोलने म्हणून विचार करत आहेत ही अतिशय मौलिक अशी गोष्ट आहे असे म्हणणे भाग आहे.नव अभ्यासकांनी नव्या परिप्रेक्षा मधून या गोष्टीकडे पाहून नवे दृष्टीकोन चळवळीपुढे मांडायला हवे.संतांच्या या आंदोलनानंतर आधुनिक भारतातील म.जोतिराव फुले यांनी जे समतेचे आंदोलन उभा करून जात्व्यव्स्थेला आव्हान उभा केले ते केवळ अद्वितीय असेच आहे.त्यांचे सर्व लेखन,बांधलेल्या संघटना आणि विविध आंदोलने हि जात व्यवस्था नष्ट होऊन समतेची व्यवस्था निर्माण व्हावी यासाठीची होती हे लक्षात येते नव्हे;पुढच्या काळात समतेच्या आंदोलनाची दिशा काय असावी याचे ससूचन हि ते तय्न्च्या लेखन/विचार आंदोलनातून करतात.म्हणूनच जोतीबाबद्दल गौरवोद्गार काढताना डॉ.भालाचान्द्र मुणगेकर म्हणाले होते'गेल्या चार-पाचशे वर्षातील सर्व महापुरुष एका पारड्यात बसविले आणि दुसऱ्या पारड्यात म.जोतिराव फुले यांना ठेवले तर जोतीबंचेच पारडे जड भासेल." ९ मुणगे करांच्या या उद्गारात कसलीही अतिशयोक्ती वाटण्याचे कारण उरत नाही.

जोतिबानंतर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे,राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या चाल्वालीतून आणि कार्यातून या जातीव्यवस्थेला हादरे देण्याचे काम केले. याच कालखंडामध्ये जातीअंताचे आंदोलन शिखराव्स्थेलाघेऊन जाण्याचे काम कोणी केले असेल तर ते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी,जातिव्यवस्थेचा अंत करून समता-स्वातंत्र्य आणि बंधुतेवर आधारलेल्या राष्ट्राची निर्मिती हेच बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवित ध्येय होते त्यांच्या आयुष्याचे मिशन होते.म्हणून त्यांनी १९२४ साली

स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेपासून त्यांनी उभारलेली सर्व आंदोलने संविधान सभेताला प्रवेश/संविधानाची निर्मिती आणि शेवटी त्यांनी स्वीकारलेला धम्म सोबतीला संपूर्ण आयुष्यात निर्माण केलेली ग्रंथसंपदा पहिली तरी डॉ.बाबासाहेबांचे हे संपूर्ण आंदोलन जातीअंताचे आदोलन होते हे कोणाच्याही लक्षात येईल.१९३६ साली लाहोरच्या जात-पात तोडक मंडळासमोर डॉ.बाबासाहेबांचे भाषण होणार होते.आयोजकांनी त्यांचे लिखित भाषण मागविलेही होते.मात्र ते भाषण वाचताच ते चक्रावून गेले आणि बाबासाहेबांनी त्यात काही बदल करावेत अशी विनंती केली.डॉ.बाबासाहेब बदल तर सोडा स्वल्पविरामहि काढायला तयार नव्हते.आणि शेवटी बाबासाहेबांचे ते भासण झालेच नाही.त्यमुळे ते भाषण त्यांनी ग्रंथरूपाने प्रकाशित केले.ते भाषण म्हणजेच ''जातीव्यवस्थेचे उच्चाटन'( unhiletation of caste) होय.बाबासाहेबांनी त्यात जाती अंताचा कृतीकार्यक्रमच दिला आहे जो आजही प्रचंड क्रांतिकारी आहे.त्यातला पहिला कार्यक्रम आंतरजातीय विवाह हा सांगितला आहे.ज्या ब्राहाम्नी विवाह संस्थेमुळे जात निर्माण केली गेली  व तो एक प्रमुख आधार ठरली त्याला उद्ध्वस्त करणे परंतु केवळ अशा विवाहामुले जात  ननष्ट होईल असे बाबासाहेबांना निश्चित वाटत नव्हते.त्यांनी अत्यंत क्रांतिकारी उपाय सुचविला तो ब्राह्मणी धर्माशी संबंधित होता.त्यांच्या मताप्रमाणे ब्राह्मणी धर्मच जातीचे संस्कार शिकवितो.आणि हा धर्म ज्या धर्मग्रंथावर उभा आहे ते धर्मग्रंथ जातीला पावित्र्य देतात.म्हणून बाबासाहेब म्हणतात जाती नष्ट करायच्या असतील तर धर्मश्रद्धा उद्ध्वस्त करण्याशिवाय तरणोपाय नाही.हा उपाय म्हणजे ब्राह्मणी धर्माचा कोथळा बाहेर काढण्यासारखाच होता,त्यामुळे ब्राह्मणी व्यवस्थेचे पित्त आजही प्रचंड खवळते.रोगाचे संपूर्ण उच्चाटन करायचे तर आपरेशनला आणि त्याच्या साधनाला घाबरून कसे जमेल?भारतीय संविधानाच्या माध्यमातूनही भारतीय जात व्यवस्थेला खिळखिळे करण्याचे काम त्यांनी केले.जातीअंताचा एक प्रभावी कार्यक्रम त्यांना संविधानात अंतर्भूत करायचा होता मात्र काँग्रेस मुळे करता आला नाही तो म्हणजे राष्ट्रीय संपत्तीचे फेरवाटप /उद्योगाचे आणि शेतीचे राष्ट्रीय करण मात्र संविधान सभेत याला प्रचंड विरोध झाला आणि हे बारगळले.या देशाची विषमता दोन प्रकारची आहे.एक आर्थिक आणि दुसरी सामाजिक.

भारतीय संविधानाच्या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय विषमता संपवली परंतु जो पर्यंत आर्थिक व सामाजिक विषमता संपत नाही तोपर्यंत राजकीय समतेला अर्थ उरत नाही.आणि संविधानाचे श्रेष्ठत्व तिचा अंमल करणारावर अवलंबून असल्यामुळे बाबासाहेब जाती अंताचा कार्यक्रम भारतीय संविधानावर सोडून द्यायला तयार नव्हते म्हणूनच त्यांनी शेवटी समता-स्वातंत्र्य-बंधुत्त्व आणि न्यायावर उभा असलेल्या बौद्ध धम्माचा स्वीकार करून जात्व्यावास्थेवर अखेरचा प्रचंड प्रहार केला हे सर्वश्रुत आहे.शेवटी प्रशन उरतो की भारतीय जातिव्यवस्थेची आजची स्थिती काय आहे?जातव्यवस्था प्रचंडप्रमणात खिळखिळी झाली आहे,मात्र ती संपलेली नाही हे वास्तव आहे आणि ती नव्या स्वरुपात अधिक घट्ट होते आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या कृती कार्यक्रमावर आणि विचार आंदोलनावर संपूर्ण स्वातंत्र्याला कवेत घेणाऱ्या प्रबोधनाच्या चळवळी उभा राहत आहेत मात्र त्या फळास यायला काही अवधी लागणारा आहे असे दिसतेय ,तर दुसऱ्या बाजूला या देशातील सत्तधारी पक्ष आपल्या अजेंड्यावर जातीअंताचा कार्यक्रम घ्यायचा चुकूनही विचार करायला तयार नाहीत,नव्हे;जात हाच त्यांच्या राजकारणाचा मुख्य आधार झालेला आहे.म्हणून जात व्यवस्थेचे बळी असणाऱ्या ८५% बहुजन बंधवाची एकमुठ बांधून प्रचंड असे जन आंदोलन उभा करून संपूर्ण क्रांतीसाठी रस्त्यावर उतरण्याशिवाय दुसरा पर्याय असेल असे वाट नाही,आणि असे आंदोलन जर उभा झाले तर आंतरराष्ट्रीय पातळीवरूनही प्रचंड दबाव वाढून संपूर्ण क्रांतीचे आंदोलन आपल्या निश्चित गन्तव्याप्रत हमखास पोहोचेल.

**संदर्भ**

1. आंबेडकर बाबासाहेब आंबेडकर ), जातीप्रथेचे विध्वंसन-अनु पुणे, सुगावा प्रकाशन( गौतम शिंदे, २००५.आ.दु
2. पवार दया १९९३.आ.प्र,मुंबई.म.स.सा.रा.म,बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ.डॉ(संपा)
3. डॉ.डॉ३, बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती २०१६.आ,मुबई,
4. पुनियानी राम २०१९,दुसरा संस्करण,नवी दिल्ली,सेज प्रकाशन,सत्ता और हिंसा,धर्म,
5. कसबे रावसाहेब २००८.आ.दु,पुणे,सुगावा प्रकाशन,मानव आणि धर्मचिंतन,